# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### शेगाव (जि.बुलढाणा) येथील सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचा-यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१) १२९९० (१०-०९-२०२०). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (जि.बुलढाणा) येथील सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयातील कोरोना संकटाच्या काळात जीवाची बाजी लावून काम करणा-या कर्मचा-यांचे दोन महिन्यांपासून शासन आदेश नसल्याने पगार रोखले गेल्याने शेकडो कर्मचा-यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील लिपिक यांनी सरत्या महिन्यांआधीच संपूर्ण कर्मचा-यांची पगार बिल बनविणे बंधनकारक असून तसे आदेशही आहेत परंतु सर्व अधिकारी कामात हलगर्जीपणा करीत असल्याने कर्मचा-यांचे पगार १५ ते २० तारखेला होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू रुग्णालयाचे पगार काढण्यात होणा-या विलंबास जबाबदार असणा-या अधिकारी व कर्मचा-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

संबंधित लिपीकाकडून महिन्याच्या सरतेशेवटी विहित कालावधीत सेवार्थ प्रणालीवर वेतन देयके तयार करण्यात येते.मागिल महिन्याचे देयके कोषागारामधुन लॉक झाल्याशिवाय नियमित महिन्याचे देयक ऑनलाईन सेवार्थ प्रणालीवर स्विकारत नाही.अनुदान प्राप्त नसल्यास १५ ते २० दिवस विलंब होतो.तसेच दि. ०८ मे,२०२० च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार उने अनुदानातून लेखाशिर्षामध्ये वेतन देयके अदा करता येत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

### लातूर जिल्ह्यात दुष्काळ आणि टंचाईसदृश्य परिस्थितीत पाणी पुरवठा केलेल्या खर्चाच्या तपशिलाबाबत

**(२) २६७६९ (२०-०३-२०२१). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील काही गावांमध्ये दुष्काळ आणि टंचाईसदृश्य परिस्थितीत या गावातील नागरीक व जनावरांना पिण्यासाठी पाणीपुरवठा करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ ते २०२१ या कालावधीत पाणी पुरवठा करण्यासाठी रेल्वे, शासकीय टँकर, खाजगी भाडेतत्त्वावर घेतलेले टँकर, विहिरी अधिग्रहण इत्यादीसाठी घटकनिहाय किती खर्च करण्यात आला, या खर्चाचे वर्षनिहाय विवरण देण्यात यावे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१२-०५-२०२१) :** (१) होय,
(२) पाणी टंचाई सन २०११-१२ ते २०१९-२० अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या उपाययोजना व त्यावर झालेल्या खर्चाचा तपशिल (रु.लाखात)

| ग्रामीण भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| ६४.५२ | २४.४९ | १८.१२ | ४१३.३१ | १५०९.७५ | २.६८ | ७.३७ | ६०२.१८ | २३.२० | ०.०० |
| विहीर/ विंधन विहीर अधिग्रहण | | | | | | | | | |
| २०४.९८ | २१०.४७ | ६१.४८ | ७१०.०८ | १२१५.५ | १८.०७ | ५६.३६ | १०७७.४ | १८७.२९ | ०.०० |
| नळ योजना विशेष दुरुस्ती | | | | | | | | | |
| २१५.०२ | २२४.३ | ९४.७१ | १७२.९८ | ६६.३ | १०.४२ | १८.७३ | ४२२.२२ | २९१.१० | ०.०० |
| विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती | | | | | | | | | |
| ४०.९८ | ० | ० | ३.४५ | ०.९२ | ० | ० | ० | ०.०० | ०.०० |
| तात्पुरती पूरक नळ योजना | | | | | | | | | |
| ८.४८ | १५४.५१ | ३६.१७ | २०२.३ | २२२.७३ | ८.८१ | ५२.९५ | २१८.४७ | ३३७.५६ | ०.०० |
| विहीर खोल करणे/ गाळ काढणे | | | | | | | | | |
| ० | ० | ० | २०.४३ | ५९.८६ | ० | १.१६ | ३०.४९ | ३५.४५ | ०.०० |
| नवीन विंधन विहीर घेणे | | | | | | | | | |
| ५२.५ | ११६.५७ | १३.२५ | ९१.७ | ६०.२५ | ० | ० | ५७.३१ | ७.२० | ०.०० |
| बुडक्या घेणे/ चर खोदणे | | | | | | | | | |
| ० | ० | ० | ०.२४ | ० | ० | ० | ९.४३ | ०.०० | ०.०० |
| विद्युत जिनित्राद्वारे पा.पु. करण्यासाठी डिझेलचा खर्च | | | | | | | | | |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५.२३ | ०.०० | ०.०० |
| लातूर शहर महानगर पालिका (नागरी भाग) करिता रेल्वेद्वारे पाणी पुरवठा खर्च | | | | | | | | | |
| ० | ० | ० | ० | ० | ५.२३ | ० | ० | ०.०० | ०.०० |
| टँकरद्वारे पाणी पुरवठा (नागरी भाग) | | | | | | | | | |
| ० | ० | ० | ० | ० | ९१४.८० | ० | ० | ०.०० | ०.०० |
| नदी पात्रात चर व विंधन विहीर घेणे (नागरी भाग) | | | | | | | | | |
| ० | ० | ० | ० | ० | २.३५ | ० | ० | ०.०० | ०.०० |

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना विम्याचा लाभ व अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबत

**(३) २७२५९ (११-०६-२०२१). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती सुलभा**

**खोडके (अमरावती), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात जिवाची पर्वा न करता सेवा देणाऱ्या महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना ५० लाखांच्या विम्याचे संरक्षण तसेच त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचा निर्णय मा.परिवहन मंत्री यांनी घेतला असून याची मुदत दिनांक ३१ जून, २०२१ पर्यंत वाढविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आता सदर विम्यासाठी संबंधीत कर्मचा-याचा मृत्यू होण्यापूर्वी तो १४ दिवस आधी कर्तव्यावर असला तरच त्याच्या वारसांना ५० लाख रुपयांची आर्थीक मदत देण्याची वादग्रस्त अट एसटी महामंडळाने घातली असल्याने कोरोनामुळे मुत्यू झालेल्या २१२ कर्मचाऱ्यांपैकी केवळ ११ कुटुंबांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याचे दि. ८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे तसेच केवळ आठ कुटबांनाच विम्याच्या रकमेचा लाभ मिळाला , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेकदा कर्मचारी हजर असले तरी ड्युटी लावली न गेल्याने सदर अटीची पूर्तता होत नसल्याने विम्याचे दावे मंजूर करताना अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोना काळात मृत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना विम्याचा लाभ, अनुकंपा तत्वावर नोकरी व आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र शासनाने दि.२९.०५.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याचा कोविडमुळे मृत्यू झाल्यास सदर मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांस अटींच्या अधीन रु.५० लाख रकमेचे सानुग्रह सहाय्य लागू केले असून, सदर शासन निर्णयातील अटींसह महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दि.०१.०६.२०२१ रोजीच्या परिपत्रकांन्वये कोविड-१९ संक्रमणाच्या कालावधीत प्रत्यक्ष प्रवाशांच्या संपर्कात येणारे राज्य परिवहन कर्मचारी म्हणजेच चालक/वाहक, चालक तथा वाहक, वाहतूक नियंत्रक, सहा.वाहतूक निरीक्षक व सुरक्षा रक्षक यांचा कोवीड-१९ च्या संक्रमणामुळे मृत्यू झाल्यास त्यांना रु.५० लाखांचे विमा कवच/सानुग्रह सहाय लागू करण्यात आले आहे.

कोविड-१९ मुळे एकूण २८७ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून, सदर परिपत्रकातील अटींनुसार पात्र ठरणाऱ्या १० कर्मचाऱ्यांना रु.५० लाखाचे विमा कवच/सानुग्रह सहाय अदा केले आहे.

राज्य परिवहन सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या एका अवलंबितास शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर सेवेत घेण्याची तरतूद आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्य परिवहन महामंडळातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात येते. त्यानुसार कोरोना संसर्गाने मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांचे वारस अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र आहेत.

तसेच, शासनाच्या निकषात बसत नाही, या कारणास्तव ५० लाखांचे विमा कवच/सानुग्रह सहाय पासून वंचित राहिलेल्या राज्य परिवहन कर्मचाऱ्यांच्या वारसांना राज्य परिवहन महामंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निकषाप्रमाणे रु.५ लाख इतकी मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या विविध महाविद्यालयांकडून मर्यादेपेक्षा अधिक शुल्क आकारणी होत असल्याबाबत

**(४) २७२८१ (११-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या विविध महाविद्यालयांची शुल्क नियामक प्राधिकरणाकडून पाहणी केली असताना महाविद्यालये मर्यादेपेक्षा अधिक शुल्क विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम आणि इतर शुल्काच्या नावाखाली जमा करत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शुल्काची मर्यादा थेट ५० हजारापासून ते २ लाखांपर्यंत असल्याचे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविद्यालयातील अंतर्गत उपक्रमांच्या नावाखाली देखील ४० हजारापासून ते एक लाख रुपयांपर्यंतची रक्कम विद्यार्थ्यांकडून या शैक्षणिक संस्था घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अनामत शुल्काशिवाय आणखी ३ ते ४ लाख रुपयांची रक्कम डिपॉझिटच्या नावाखाली जमा करावी लागत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर चुकीच्या पध्दतीची शुल्क आकारणी करणाऱ्या शिक्षण संस्थानांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०४-०३-२०२२) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाने महाविद्यालयांच्या संकेतस्थळाची पाहणी करीत असतांना काही महाविद्यालयांनी कॉशन मनी, डॉक्टर क्लब, लायब्ररी डिपॉजीट, स्टुडंट असोसिएशन, स्टुडंट वेलफेअर, कॉलेज किट, सिक्युरिटी डिपॉजिट अशा शिर्षाखाली विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुली केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) वरील कॉशन मनीबाबत मा.अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण यांनी दि.१७.२.२०२१ रोजी ऑनलाईन बैठक घेतली होती.

तसेच प्राधिकरणाच्या दि.१७.३.२०२१ च्या बैठकीत महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून वसुल करीत असलेल्या अतिरिक्त शुल्काबाबत निर्णय घेण्यात आलेला असून सदर निर्णय प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

त्यानुसार ज्या महाविद्यालयांनी संकेतस्थळावर कॉशन मनी हे अतिरिक्त शुल्क दर्शविले आहे. अशा वैद्यकीय महाविद्यालयांना शुल्क नियामक प्राधिकरणाकडून सदर शुल्काचा खुलासा सादर करण्याबाबत पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर पत्रांवर काही महाविद्यालयांचे खुलासे प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये संस्थेने असे नमूद केलेले आहे की, कॉशन मनी विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर त्यांनी अर्ज केल्यानंतर परत केली जाते. तसेच सर्व वैद्यकीय महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०१५ ते २०२१ बाबतची माहिती प्राधिकरणाकडून मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर अशी प्रकरणे प्राधिकरणासमोर निर्णयासाठी ठेवण्यात येणार आहेत.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## साकीनाका (मुंबई) येथील एका गोदामावर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून ऑक्सिजन सिलिंडर हस्तगत केल्याबाबत

**(५) २७६२७ (०९-०६-२०२१). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकीनाका (मुंबई) येथील परिसरात एका गोदामावर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने घातलेल्या धाडीत २ लाख ८५ हजार किंमतीचे ३१ हून अधिक ऑक्सिजन सिलिंडर हस्तगत केल्याचे दिनांक १६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या संकटात मास्क, सॅनिटायझर, इंजेक्शननंतर आता रुग्णांचे प्राण वाचविण्यास महत्वाचे असलेल्या ऑक्सिजनच्या सिलिंडरची साठेबाजी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींना अटक करण्यात आली आहे काय, तसेच त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत त्यात्या कार्यक्षेत्रात संबधीत सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत ऑक्सिजनचा साठा व वितरण यावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

(३) व (४) याप्रकरणी शासनाने चौकशी केली असून आरोपीविरुध्द पोलीसांनी प्रथम खबर अहवाल क्र.५०३ दि. १५.०५.२०२१ नुसार भा.द.वि. कलम १८८, ३(२)(C) आणि औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील कलम १८(C), २७(b)(ii) अन्वये दाखल केला आहे. चाचणी व विश्लेषणार्थ घेण्यात आलेल्या नमुन्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधिताविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत योग्य ती कारवाई घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हातमाग महासंघावरील कार्यकारी संचालक पदावर सेवानिवृत्त अधिकाऱ्याची केलेली नेमणूक रद्द करण्याबाबत

**(६) २८३६६ (०९-०६-२०२१). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हात माग महासंघावरील कार्यकारी संचालक पदावर सेवानिवृत्त अधिकाऱ्याची केलेली नेमणूक रद्द करून त्या ठिकाणी मंत्रालयातील इतर सक्षम अधिकारी नेमण्यात यावा अशा मागणीचे सविस्तर निवेदन महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई यांनी दिनांक १९ जानेवारी २०२१ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री, वस्त्रोद्योग मंत्री, वस्त्रोद्योग राज्यमंत्री, आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, नागपूर आदींकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त अधिकारी यांची सदर नेमणूक करताना वस्त्रोद्योग विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ८ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब केलेला नाही त्यामुळे ही नेमणूक बेकायदेशीर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त अधिकारी यांची हातमाग महासंघावर झालेल्या नेमणुकीमुळे हातमाग महासंघाला त्यांच्या पगारापोटी व अन्य शासकीय सोयी सवलतींसाठी दरमहा सुमारे दोन लाख रुपयांवर नाहक खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघाच्या संदर्भाधीन मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०८-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सेवानिवृत्त अधिकारी यांची सदर नेमणूक करतांना वस्त्रोद्योग विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ८ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही हे खरे आहे, तथापि सदर शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये, शासकीय उपक्रम, संविधीक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू आहे. महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., (महाटेक्स), मुंबई ही संस्था अनेक सहकारी संस्थांचा महासंघ असून उपरोक्त शासन निर्णयात नमुद शासकीय संस्थांच्या सुचीमध्ये मोडत नाही.
(३) सेवानिवृत्त अधिकारी यांच्या हातमाग महासंघावर कार्यकारी संचालक पदी झालेल्या नेमणुकीमुळे महासंघास कार्यकारी संचालक यांच्या वेतनापोटी रु. १,०२,५८५/- प्रति माह खर्च करावा लागत आहे. तसेच कार्यकारी संचालक यांना अनुज्ञेय असलेल्या वाहनासाठी, वाहनचालकाच्या वेतनाचा खर्च व वाहनाची देखभाल व इंधन खर्च महासंघास करावा लागत आहे.
(४) व (५) श्री.बी.बी.चव्हाण, सेवानिवृत्त सहसचिव यांची महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघावर कार्यकारी संचालक म्हणून केलेली नियुक्ती रद्द करणेबाबत महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघाने शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ६४१६/२०२० दाखल केली आहे. सध्या सदर रिट याचिका न्यायप्रविष्ठ आहे.

---

## जेएनपीटी आणि पनवेल मधील कळंबोली, खांदा, नवीन पनवेल व पनवेल शहर (जि.रायगड) आदी भागात जीर्ण जलवाहिनीमुळे पाणी निर्माण झालेली पाणी टंचाई

**(७) २८७८० (१८-०६-२०२१). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने न्हावाशेवा टप्पा एक ही सन १९८९ मध्ये विकसित केलेल्या योजनेच्या जीर्ण जलवाहिनी मुळे जेएनपीटी आणि कळंबोली, खांदा, नवीन पनवेल व पनवेल शहर (ता.पनवेल) येथे पाणी समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जलवाहिनीतून वारंवार होणाऱ्या पाणी गळतीमुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास काही काळ पाणी बंद करावे लागते व त्यामुळे दोन दोन दिवसांसाठी पाणीपुरवठा खंडित होत असून यास सिडकोची वितरण यंत्रणा देखील जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ४० वर्षे जुन्या झालेल्या जलवाहिनीला आठवड्यातून एकदा तरी गळती लागत असल्याने सदर जलवाहिनी रिकामी होऊन पुन्हा पाणी पुरवठा सुरळीत झाल्यानंतर १२०m क्षमतेची जलवाहिनी भरण्यासाठी अधिक वेळ लागतो आणि शटडाऊनचा कालावधी वाढतो त्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जीर्ण झालेल्या जलवाहिन्या विनाविलंब बदलून सदरहू परिसरातील जनतेस नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (३०-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे. जलवाहिनीतून होणाऱ्या पाणी गळतीमुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास नियमित देखभाल दुरुस्तीसाठी महिन्यातून दोन वेळा काही काळ पाणी बंद करावे लागते. तथापि, त्याच दिवशी पाणी पुरवठा चालू करण्यात येऊन सिडको व इतर ग्राहकांना ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करण्यात येतो.
(४) सदर परिसरातील जनतेस नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने २२८ द.ल.लि. क्षमतेची वाढीव न्हावा-शेवा टप्पा-३ या नवीन योजनेचे काम प्रगतीपथावर असून, सदर काम जून-२०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील वैद्यकीय पदांची भरती करण्याबाबत

**(८) ३०४१९ (१५-०६-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालय २ वर्षांपासून रुग्ण सेवेसाठी सज्ज असताना वैद्यकीय पदे भरती अभावी सदर रुग्णालय अद्याप कार्यरत झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळात सदर सुपर स्पेशालिटी रुग्णालय आरोग्य सेवेसाठी रुग्णांना तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी शासनाकडून ७६५ पदांना मंजुरी देऊन प्रथम टप्प्यात २२३ पदांची भारती व मंजुरी आदेश दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी वा त्यासुमारास पारीत केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयातील पद भरती करण्याबाबत तसेच रुग्णसेवेकरीता उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३), (४) व (५) प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजने अंतर्गत अकोला येथील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय टप्प्याकरीता वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गात एकूण ४६५ पदांची निर्मिती करण्यात येत आहे. त्यानुसार प्रथम टप्प्याकरिता २२३ पदे निर्माण करण्यास दि.०८.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झाली आहे. पद भरतीच्या अनुषंगाने वर्ग-अ व वर्ग-ब संवर्गातील अतिविशेषोपचार विषयातील सरळसेवेचे प्राध्यापक-१६, सहयोगी प्राध्यापक-२० व सहायक प्राध्यापक-९० तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी-६ व प्रशासकीय अधिकारी-२२ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आले आहे. त्यानुसार आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. त्याचप्रमाणे रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. वर्ग-३ संवर्गाची पदे सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २२.०४.२०२१ च्या परिपत्रकानुसार संचालनालयामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच वर्ग-४ संवर्गाची पदे बाह्यस्त्रोताने भरण्याबाबत सूचना संबंधीत संस्थेत देण्यात आल्या आहेत.

---

## चिखली (जि बुलढाणा) येथील उपजिल्हा रुग्णालयात होत असलेले गैरप्रकार

**(९) ३२२६३ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि बुलढाणा) येथील उप जिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेली नर्स प्रसूती साठी येणा-या महिलांकडून पैसे घेतल्याशिवाय त्यांची प्रसूती करत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसूती झालेल्या स्त्रीच्या नातेवाईकांनी ५०० रुपये दिले नाहीत म्हणून तेथील नर्सने बाळ देण्यास नकार दिल्याची घटना दिनांक २२ डिसेंबर,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तातडीने चौकशी करून यास दोषी असण्या-या संबधिताना निलंबित करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक , बुलढाणा यांच्याकडे दिनांक २३ डिसेंबर,२०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत संबंधितांवर कारवाई करणेसह असे प्रकार पुन्हा घडणार नाहीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२५-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) श्रीमती एम.एल. ठाकरे, अधिपरिचारीका यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली होती. प्राथमिक चौकशी अहवालनानंतर म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भावामुळे शालेय परिक्षांबाबत मुल्यमापन करण्याबाबत

**(१०) ३२५०१ (१२-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाचा प्रादुर्भावामुळे रद्द करण्यात आलेल्या शालेय परिक्षांबाबत मुल्यमापन करण्याची योजना शिक्षण विभागाने आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे व याबाबतची नियमावली शिक्षण विभागाने निश्चित केली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) कोविड-१९ परिस्थितीमुळे सन २०२०-२१ मध्ये इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिकार अधिनियम २००९ कलम १६ नुसार विद्यार्थ्यांना वर्गोन्नत करण्यात आले आहे. तथापि. अध्ययन ऱ्हास भरून काढण्यासाठी सन २०२१-२२ मध्ये प्रथम सत्राच्या सुरवातीलाच ४५ दिवसाचा सेतू अभ्यासक्रम इयत्ता २ री ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला होता.

शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ साठी इयत्ता १० वी साठी दि.२८.५.२०२१ व इयत्ता १२ वी साठी दि.२.७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये पर्यायी मूल्यमापन योजना केली होता.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यातील यंत्रमाग उद्योग व्यवसायिकांना सवलतीत निर्माण होणाऱ्या त्रुट्या दूर करण्याबाबत

**(११) ३२६६४ (०७-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील यंत्रमाग उद्योग व्यवसायिकांना देण्यात येणाऱ्या वीज व व्याजदर सवलतीत अनेक त्रुटी असून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया क्लिप स्वरुपाची असल्याने व्यवसायिकांना योजनांचा लाभ घेताना अडचणी निर्माण झाल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वीज व व्याज दराच्या सवलतीत असणाऱ्या त्रुटी दूर करण्यासंदर्भात उद्योग व्यावसायिकांकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०४-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

धुळे जिल्हयातील यंत्रमाग उद्योग व्यवसायीकांना वीज व व्याज दर सवलतीच्या योजनांचा लाभ घेतांना अडचणी निर्माण झाल्याबाबतचे निवेदन दिनांक २५ सप्टेंबर, २०२१ रोजी व त्या सुमारास वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर कार्यालय वा शासनास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई खाडीतील भाईंदर आणि नायगांवमध्ये ६०० एकर जागेवर वसलेल्या पाणजू बेटाचा पर्यटन विकास करण्याबाबत

**(१२) ३२७९० (०५-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नीती आयोगाने सन २०१८ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार देशामधील एकूण १ हजार ३८२ बेटांपैकी २६ बेटांचा पर्यटनस्थळ विकास केला जाणार असून त्या बेटांमध्ये वसई तालुक्यातील पाणजू बेटाची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, वसई खाडीतील भाईंदर आणि नायगांवमध्ये ६०० एकर जागेवर वसलेल्या पाणजू बेटाचा पर्यटन विकास करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आलेला पर्यटन विकास आराखडा पालघर जिल्हा नियोजन समितीमार्फत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन स्तरावर पाणजू बेटाच्या विकासा संदर्भात कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०३-०२-२०२२) :** (१) होय,
(२), (३) व (४) विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, यांचेकडून शासनास प्राप्त झालेल्या पाणजू बेटाच्या सर्वांगीण विकासाच्या आराखडयामधील प्रस्तावित कामे विविध प्रशासकीय विभागांशी संबंधित असल्याने व या आराखडयातील कामे केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या अभिसरणाद्वारे करावयाची असल्यामुळे संबंधीत प्रशासकीय विभागांच्या अभिप्रायासह सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांना कळविण्यात आले आहे.

---

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला अद्यापपर्यंत सुरूवात झाली नसल्याबाबत

**(१३) ३७७२६ (०९-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला राज्य परिवहन महामंडळाकडून काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेत कुर्डुस पार्क या ठेकेदार कंपनीने सादर केलेल्या निविदेला मान्यता दिली असतांना नुतनीकरणाच्या कामाला अद्यापपर्यंत सुरूवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीमार्फत माहे डिसेंबर २०१८ मध्ये कामाला सुरूवात होणे आवश्यक असताना मे.कुर्डूस पार्क इंटरनॅशनल प्रा.लि. या विकासकाद्वारे प्रकल्पाचे आराखडे मंजूरीकरीता पनवेल महानगरपालिकेस सादर करण्यात आले

असता महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार त्यात काही बदल सुचविण्यात आले व त्यानुसार बदल करुन नकाशे पुन्हा सादर करण्यात आले परंतु महानगरपालिकेची अद्याप नकाशांना मान्यता प्राप्त झाली नसल्याने सदर आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाब शासनाच्या वारंवार निदर्शनास आणुनसुद्धा संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळे पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामास विलंब होत असल्यामुळे प्रवासी व नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२२) :** (१) व (२) होय, सदर प्रकल्पाचा विकास करार दि.०८.०३.२०२२ रोजी करण्यात आला आहे. तसेच विकासकाव्दारे प्रकल्पाचे नकाशे पनवेल महानगरपालिकेत सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. नकाशांना महानगरपालिकेकडून मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल.
(३) प्रवाशांना अडचण निर्माण होऊ नये याकरिता तात्पुरत्या स्वरुपाची अदांजे ६० मी X २ मी मापाची शेड उभारलेली असून त्यासमोरील वाहनतळास कॉक्रीटीकरण केलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई नागपूर महासमृद्धी मार्गावरील पाच मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(१४) ३७७६५ (३०-०३-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-नागपूर या राज्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या समृध्दीमार्गावरील सिग्नल यंत्रणा, सीसीटीव्ही, विद्युत दिवे व इतर विद्युत यंत्रणा अखंडीत वीज पुरवठ्याने सुरु रहावी याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ५ मेगाव्हॅटचा सौर उर्जा प्रकल्प उभा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी किती कंपन्यांकडून निविदा मागविण्यात आल्या असून प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणत्या कंपनीची निविदा मंजूर करुन हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी वीज पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्पासाठी ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. दोन निविदा प्राप्त झाल्या असून निविदा छाननी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंबीपाडा (ता.भिवंडी, जि. ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(१५) ३८४२६ (२४-०४-२०२२). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंबीपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे दि. १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास ई-मेलद्वारे निवेदन पाठवून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) तसेच, त्यांनी कोव्हीड १९ कालावधीत जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्या आदेशाचा अवमान करून आरोग्य विषयक बाबींचे अत्यावश्यक अहवाल सादर केलेली नाहीत असेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात वैद्यकीय अधिकारी, चिंबीपाडा प्राथमिक आरोग्य केंद्र यांची चौकशी करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी चौकशी समिती नेमली होती, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणी नुसार तसेच सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार वैद्यकीय अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे, पूर्वीच्या तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांच्या अधिनस्त चौकशी समिती नेमण्यात आली होती.
(४) चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंबीपाडा, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नाली पाटील व डॉ. माधव केरबा वाघमारे यांच्याविरूद्ध दि.०६.०९.२०२१ रोजीच्या ज्ञापनानुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात आली होती. या प्रकरणी दि.०८.०४.२०२२ च्या आदेशान्वये डॉ.स्वप्नाली पाटील, वैद्यकीय अधिकारी यांना सदर विभागीय चौकशीतून दोषमुक्त करण्यात आले आहे. तर डॉ. माधव केरबा वाघमारे यांची प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्यामार्फत विभागीय चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव विधानसभा मतदार संघातील (जि.नाशिक) ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे करीता नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत

**(१६) ४०९७७ (०१-०४-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव विधानसभा मतदार संघातील (जि.नाशिक) ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे करीता नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने नियमानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना कळविण्यात आले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार लोकसंख्या निकषाची पूर्तता होत नसल्याने नांदगाव विधानसभा मतदार संघातील ग्रुप

ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे याकरीता नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत प्रस्ताव सादर करता येत नसल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पुणे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन अधिकारी डॉंक्टर आणि कृषी अधिकारी यांच्या अनागोंदी कारभाराबाबत**

**(१७) ४१७५० (११-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेतील पशुसंवर्धन अधिकारी, डॉक्टर आणि कृषी अधिकारी वैद्यकीय रजेवर असतांनाही ते कार्यालयात येऊन नस्त्यांवर सह्या करीत असून तालुक्यातील बी-बीयाणे दुकानांना भेटी देत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिकार्यांना शासनाच्या वैद्यकीय पथकासमोर हजर करुन त्यांचे मेडीकल प्रमाणपत्र तपासण्याचे निर्देश स्थायी समितीच्या बैठकीत जिल्हा परिषद अध्यक्षांनी दिले आहेत, हे ही खरे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०२-०८-२०२३) :** (१) नाही
(२) नाही
(३) श्री.एस.बी. विघाटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व श्री.ए.एन. देशमुख, कृषी विकास अधिकारी या दोघांचेही जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांचे प्रमाणपत्र मिळाल्यामुळे , वैद्यकिय रजेची खात्री पटल्याने दोघांनाही रुजू करुन घेण्यात आलेले आहे व त्यांची वैद्यकिय रजा मंजूर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**कानडीबदन.( केज, जि. बीड) येथील मंजूर साठवण तलावाचे बंद असलेले काम सुरु करणे बाबत.**

**(१८) ४३७३१ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कानडीबदन (ता. केज, जि. बीड) येथे स्व.मा.मंत्री, डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांनी परिसरातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची गरज लक्षात घेवून साठवण तलावास मंजूरी देण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर साठवण तलावाचे काम सुरु ही करण्यात आले होते परंतू कालांतराने काही कारणास्तव सदर तलावाचे काम बंद आहे. हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कानडीबदन व परिसरातील लोकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी सदर साठवण तलावाची निर्मिती अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मंजूर साठवण तलावाचे बंद असलेले काम तातडीने सुरु करण्याबाबतस्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री यांचेकडे दि. ३१/०१/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर साठवण तलावाचे बंद असलेले काम सुरु करणे बाबत. शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०२२) :** (१) होय.

(२) होय.
(३) होय.
(४) व (५) या प्रकल्पामुळे ३ गावातील शेतक-यांच्या (लाडेगाव, बोरीसावरगाव, पळसखेडा) जमीनी बाधीत होत असून लाडेगाव व बोरीसावरगाव या गावातील शेतक-यांच्या जमीनीची संयुक्त मोजणीस सहमती न दिल्याने संयुक्त मोजणी करता आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पासाठीची जमीनीचा ताबा मिळाला नाही व त्यामुळे प्रकल्पाचे काम करता आलेले नाही. आता संबंधीत शेतक-यांनी संयुक्त मोजणीस सहमती दिल्याने संयुक्त मोजणी प्रगत आहे. संबंधीत शेतक-यांना मावेजा वाटपासाठी अग्रीम रक्कम महसुल विभागाकडे जमा करण्यात आलेली आहे. बाधीत होण्या-या विद्युत खाबांचे शिफटींगचे काम विद्युत मंडळामार्फत प्रगतीपथावर आहे. मोजणी पुर्ण होवुन जमीनीचा ताबा मिळाल्या नंतर बंद पडलेले प्रकल्पाचे काम सुरु होवु शकेल. माहे जुन-२४ पर्यंत घळभरणी करुन प्रकल्पीय पाणीसाठा ३.२५१ दलघमी व सिंचन क्षमता ४८० हे. निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

या प्रकल्पामुळे जमीनी बाधीत होत असलेल्या गावातील शेतक-यांच्या जमीनीची भुसंपादनासाठीच्या आवश्यक जमीनीची संयुक्त मोजणीस विरोध केल्याने संयुक्त मोजणी करता आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पासाठीची जमीनीचा ताबा मिळाला नाही व प्रकल्प पुर्ण करता आलेला नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या अंशदान निवृत्ती योजनेबाबत

**(१९) ४६५३६ (१७-०९-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय सेवेत आलेल्या शिक्षकांसाठी राज्यात दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नंतर १९८२ ची जुनी पेन्शन योजना बंद करून परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (डीसीपीएस) लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेत कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन व महागाईच्या १० टक्के रक्कम अंशदान म्हणून दरमहा वेतनातून कपात करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक शिक्षकांना निवृतीवेतन अंशदान योजने अंतर्गत कपात करण्यात आलेल्या रक्कमेचा हिशोब मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मावळ तालुक्यातील अंशदान निवृत्तीवेतन योजना अंतर्गत २६७ शिक्षकांपैकी फक्त ३८ शिक्षकांनाच राष्ट्रीय पेन्शन योजनेचे खाते क्रमांक प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेतील शिक्षकांसाठी लागू असलेल्या अंशदान निवृत्तीवेतन योजनेची उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करणेबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) मावळ तालुक्यातील २६२ शिक्षकांपैकी २२५ शिक्षकांचे प्रान नंबर जनरेट झाले असून उर्वरित ३७ शिक्षकांचे प्रान नंबर प्रस्तावात त्रुटी असून त्रुटीपुर्तते नंतर प्रान जनरेट करण्यात येईल.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील समग्र शिक्षा अभियानावरील निधी अखर्चित राहिला असल्याबाबत

**(२०) ४७८६८ (१७-०९-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या तीन योजना समायोजित करून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून समग्र शिक्षा अभियान ही एकात्मिक योजना सुरु करण्यात आली हे खरे आहे काय
(२) असल्यास, समग्र शिक्षा अभियान अंतर्गत बाल वाटीका, स्मार्ट क्लासरूम, प्रशिक्षित शिक्षकांची व्यवस्था याशिवाय पायाभूत सुविधा, व्यावसायिक शिक्षण आणि सर्जनशील अध्यापन पद्धतींची व्यवस्था करणे असा योजनेचा उद्देश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेतील महाराष्ट्र राज्यातील सुमारे ५२ टक्के निधी अखर्चित राहिला आहे हे खरे आहे काय
(४) असल्यास, यामुळे राज्यातील विद्यार्थी एका चांगल्या योजनेपासून वंचित राहिले असून, ही योजना पूर्ण क्षमतेने राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) व (४) सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष प्राप्त झालेला सर्व निधी समग्र शिक्षा योजनेसाठी वापरण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत असलेल्या आरोग्य सहायिका व सहायकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(२१) ५०२५१ (२१-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात रुग्णांना तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी नव्याने स्थापन झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत असलेल्या आरोग्य सहायिका व सहायकांचे माहे डिसेंबर, २०२१ पासूनचे वेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेतन थकीत असल्यामुळे सदर कर्मचारी आर्थिक विवचंनेत असल्याचे निदर्शनास आले आहे,
(३) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचा-यांचे वेतन थकीत असल्याची कारणे काय आहेत तसेच थकीत वेतन तात्काळ अदा करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत आर्वी (ता.परभणी), एरंडेश्वर (ता.पूर्णा), बनवस (ता.पालम), मरडसगाव (ता.गंगाखेड), शेळगाव (ता.सोनपेठ) व चिकलठाणा (ता.सेलू) येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले असून माहे जानेवारी, २०२२ मध्ये आरोग्य सहाय्यिका व आरोग्य सहाय्यक यांचे प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण १२ पदांपैकी ११ पदे पदोन्नतीने भरण्यात आलेले आहेत.

नवीन कार्यान्वित करण्यात आलेल्या सहा प्राथमिक आरोग्य केंद्रावर मंजूर आकृतीबंधाप्रमाणे पंचायत राज सेवार्थ प्रणाली मध्ये पद निर्मिती होण्यासाठी विलंब झाल्यामुळे सदर कर्मचा-यांचे माहे जानेवारी, २०२२ ते माहे जुलै, २०२२ चे वेतन व भत्ते प्रलंबित होते. या कालावधीतील त्यांचे वेतन व भत्ते इतर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आस्थापनेवरून अदा करण्यात आलेले आहेत.

तसेच, माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये पंचायत राज सेवार्थ प्रणाली मध्ये नवनिर्मित सहा प्राथमिक आरोग्य केंद्रातील मंजूर आकृतीबंधाप्रमाणे पदे निर्मित प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. सदर नवनिर्मित प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते त्यांचे मूळ आस्थापनेच्या ठिकाणावरून अहरीत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत कोणाचेही वेतन व भत्ते प्रलंबित नसून नियमित वेतन व भत्ते अदा करण्यात येत आहेत.

---

**स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे रद्द करण्याबाबबत**

**(२२) ५१७४३ (२६-१२-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली द्वारा दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास विविध कामे मंजूर करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर करण्यात आलेली कामे ही जिल्हा वार्षिक योजनेचे सदस्य असूनही स्थानिक आमदारांना विश्वासात न घेता त्यांनी दिलेल्या पत्रांना वगळून अधिकाऱ्यांनी स्वमर्जिने मंजूर करून घेतलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामे रद्द करण्यात यावी याबाबत शासनाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता परस्पर मर्जीने कामे मंजूर करून घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर तसेच कामे रद्द करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२६-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक ०१/१०/२०२२ रोजी आयोजित जिल्हा नियोजन समिती, गडचिरोली यांच्या निर्देशानुसार कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मा. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या सुरभी सह.गृह.संस्थेस देण्यात आलेल्या ओशिवरा येथील भूखंडाबाबत**

**(२३) ५१८२३ (२६-१२-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओशिवरा येथील म्हाडाच्या तीन हजार चौरस मीटर भूखंड उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या सुरभी सहकारी गृहनिर्माण संस्थेला माहे सप्टेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,९२ सदनिकांची २२ मजली इमारत बांधण्याचा खर्च ११५ ते १२० कोटी असतांना १५९ कोटी ९३ लाख ६६ हजार २२ रुपयांची प्रशासकीय मान्यता असलेला ठराव म्हाडा प्रधिकरणाने मंजुर करुन सदर कंत्राट मे.बी.जी.एस.एस. शिर्के कंपनीला देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालिन मुख्य अधिकारी यांना संदिग्धता निर्माण झाल्यामुळे त्यांनी अभियांत्रिकी विभागास सुधारीत प्रशासकीय मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देऊन ४ महिन्यांचा कालावधी होऊन अद्यापही प्रस्ताव सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२९-१२-२०२२) :** (१) ओशिवरा येथील म्हाडाच्या अभिन्यासातील भूखंडावर मा.उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांकरीता विनियम १३(२) अंतर्गत म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यास दि.१.९.२०१५ च्या पत्रान्वये शासनाची सहमती देण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५) सदरहू योजने अंतर्गत स्टील्ट + ३ पोडीअम + ३२ मजले अशी ९२ सदनिकांची इमारत प्रस्तावित करण्यात आली होती. या बांधकामाचा अंदाजित खर्च रु.११५ ते १२० कोटी होता. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग संहिता (PWD Manual) व म्हाडाचे परिपत्रक दि.९.११.१९८२ नुसार, निविदा अधिमूल्य, भाववाढ (Escalation), आकस्मिक कामाचा खर्च, आस्थापना खर्च, व्याज इत्यादी बाबींचा अंतर्भाव करण्यात आल्याने, या कामास रु.१५९,९३,६६,०२२/- इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता म्हाडाने दिली होती.

तद्नंतर सदरची योजना स्टील्ट + २ पोडीअम + सर्व्हिस फ्लोअर + २५ मजले अशी ७२ सदनिकांच्या इमारतींची योजना म्हाडाच्या स्तरावर सुधारीत करण्यात आली आहे. या योजनेतील सुधारीत नकाशांना दि.२५.११.२०२२ रोजी मंजूरी देण्यात आली आहे. या सुधारित योजनेस प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरू आहे.

---

**रत्नागिरी व सिंधुदूर्ग येथे रेशीम संचालनालय अंतर्गत स्वतंत्र रेशीम कार्यालय उभारण्याबाबत**

**(२४) ५८४९४ (१९-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रेशीम शेती हा कृषीवर आधारित उद्योग असून विशेषतः ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना, महिलांना, मजुरांना आणि वृद्धांना रोजगार मिळवून देण्याची प्रचंड क्षमता असलेला ग्रामीण उद्योग असून शासनाकडून रेशीम संचलनालय, नागपूर येथून रेशीम शेतीच्या विकास व विस्ताराचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात शासनामार्फत सर्व जिल्ह्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम शेती उत्पादनाची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०१६ या कालावधीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील कृषी हवामान आणि जमिनीचा प्रकार तूती रेशीम शेतीसाठी अनुकूल असतांनाही त्यांच्या विकासासाठी येथे शासनाकडून रेशीम संचालनालय अंतर्गत स्वतंत्र कार्यालय उभारुन कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तुती लागवड केलेल्या शेतक-यांची निकषाप्रमाणे लागवड पाहणी करुन महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत कामांना तांत्रिक मान्यता देऊन अनुदान मागणीचे प्रस्ताव प्रशासकीय यंत्रणेमार्फत संबंधित तहसील कार्यालयाला सादर करुन कामांसाठी कर्मचारी वर्ग नाही असे सांगितल्यामुळे शेतक-यांना रेशीम उद्योग प्रशिक्षण व कीटक संगोपन मार्गदर्शन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत उक्त शासन निर्णयान्वये रेशीम संचालनालय अंतर्गत स्वतंत्र कार्यालय उभारुन कोकणातील तुती लागवड केलेल्या शेतक-यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०६-२०२३) :** (१) होय,
(२) होय, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.मग्रारो -५/ प्र.क्र.७९/ रोहयो- ५, दि.३१ मार्च, २०१६ नूसार सदर योजना राज्यातील रेशीम उद्योग करणाऱ्या जिल्हयांना लागू आहे.

(३) व (४) रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयात चार महीने अंदाजे सरासरी ३०००-३५०० मी.मी पाऊस पडतो. त्यामुळे फक्त ८ महीने रेशीम पीकासाठी कालावधी मिळतो. त्यामुळे मिळणारे उत्पादन तितकेसे फायदेशीर नसल्याने शेतकरी रेशीम शेतीकडे वळत नव्हते. परतु इतर पारंपारीक पिकापेक्षा रेशीम शेतीतून चांगले उत्पन्न मिळत असल्याचे काही शेतकऱ्यांनी प्रयोगातून सिध्द केल्यामूळे तेथे रेशीम शेतकरी गट तयार होवून रेशीम शेतीस सुरूवात झालेली आहे. सध्या रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यात अल्प प्रमाणात लागवड असल्याने सदर शेतकऱ्यांना तुती लागवड मार्गदर्शन, प्रशिक्षण, अंडीपुंज पुरवठा इ.बाबत जिल्हा रेशीम कार्यालय, कोल्हापूर व अंडीपुंज निर्मिती केंद्र गडहिंग्लज येथून मदत व मार्गदर्शन केले जाते. सद्य:स्थितीत राज्यातील सर्व रेशीम शेतकऱ्यांना केंद्राच्या व राज्याच्या विविध योजनेद्वारे लाभ देण्यात येत आहे.मनरेगाच्या निकषात न बसणाऱ्या लाभार्थ्यांना केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र या योजनेतून लाभ देण्यात येतो. याकरिता सन २०२२-२३ मध्ये तुती लागवड केलेल्या व सन २०२३-२४ मध्ये तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांकडे प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटी देवून पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प संनियंत्रण समितीच्या मान्यतेने केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र योजनेतून अनुदान देण्याबाबत संचालक (रेशीम) यांचेस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये रेशीम उद्योगासाठी असलेला वाव विचारात घेऊन त्या जिल्ह्यांमध्ये स्वतंत्र रेशीम कार्यालय व विभागीय कार्यालय स्थापन करण्याबाबत संचालक (रेशीम) यांच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कार्यरत सर्व अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदी नियुक्ती करणेबाबत**

**(२५) ५८९६८ (२६-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालाचे समायोजन करण्याबाबत तसेच अर्धवेळ ग्रंथपालाचे पूर्णवेळ पदी नियुक्त करणे बाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धवेळ ग्रंथपालाचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदी उन्नयन करण्याचा प्रस्ताव शासन कधीपर्यंत मंजूर करणार आहे,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (२६-११-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यातील कार्यरत सर्व अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदी उन्नयन करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३.०४.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील हाफकिन संस्थेतील निवासी/अनिवासी इमारतींच्या विद्युत विषयक कामाकरिता देण्यात आलेल्या निधीचा गैरवापर झाल्याबाबत**

**(२६) ६०९७९ (२८-०४-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हाफकिन संस्थेतील १४ निवासी/अनिवासी इमारतींच्या विद्यूत विषयक कामे करण्याकरिता वैद्यकीय शिक्षण विभागाने १४ कोटी ४९ लाख ६५ हजार ६० रुपये इतका निधी दिनांक १५ नोव्हेंबर,२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर निधी विद्यूत विषयक कामांकरिता खर्च न करता इतर कामांकरिता शासनाच्या मानत्येशिवाय हाफकिन प्रशासनाने खर्च केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यास जबाबदार असण्या-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

हाफकिन संस्थेच्या आवारातील १) निवासी व अनिवासी १४ इमारतींचे दुरुस्ती काम २) इमारत क्र. अ,ब,क,ड आणि नवीन चाळ क्र. १ व २ या इमारतीच्या छत दुरुस्तीचे बांधकाम ३) संरक्षण भिंत बांधकाम ४) अंतर्गत रस्त्याचे बांधकाम ५) निवासी व अनिवासी १४ इमारतीचे विद्युत काम या ५ कामाकरीता एकूण रु. ७,७०,७०,०००/- इतका निधी शानस निर्णय दिनांक २८.०७.२०२२ अन्वये हाफकिन संस्थेस उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर प्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी हाफकिन संस्थेने विद्युत दुरस्तीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास रु. १,६१,००,०००/- इतका निधी विरतीत केला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. पिंपळा (बु.) (ता. तुळजापुर, जि. धाराशिव) येथील मुख्याध्यापकाने शिक्षकांचे वेतनातून कपात केलेले लाखो रक्कमेचा अपहार केल्याबाबत**

**(२७) ६४६१३ (२३-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. पिंपळा (बु.) (ता. तुळजापुर. जि. धाराशिव) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या वेतनातुन दरमहा आयकर भरणा (इन्कम टॅक्स) करण्यासाठी रक्कम कपात करण्यात येऊन त्याद्वारे ३ लाख २० हजार रुपये इतकी रक्कम शाळेच्या मुख्याध्यापकांचे बँक खात्यात जमा करण्यात येत असल्याचे व त्यातून नियमित प्रक्रियेनुसार माहे मार्च अखेरीस आयकर भरणा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात सध्याचे मुख्याध्यापक यांनी तत्कालीन मुख्याध्यापकाविरुध्द दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास गटशिक्षणाधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन संबंधित मुख्याध्यापक (श्री. राजकुमार माणिकशेट्टी) यांनी शिक्षकांच्या आयकर रक्कमेचा (Income Tax) भरणा आयकर खात्याकडे न करताच सदर रक्कमेचा (रुपये ३ लाख २० हजार) परस्पर अपहार केला असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने तत्कालीन मुख्याध्यापकाविरुध्द सदर रक्कम वसुली व आर्थिक शिस्तभंग कारवाई करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) तत्कालीन मुख्याध्यापक श्री. राजकुमार माणिकशेट्टी यांनी त्याच्या खात्यात आयकर भरण्यासाठी सर्व शिक्षकांकडून जमा करण्यात आलेली रक्कम रुपये ३ लाख २१ हजार आयकर खात्याकडे न भरताच अपहार केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणाची संयुक्त चौकशी करण्यात आली. त्यात तत्कालीन मुख्याद्यापक श्री. माणिकराव शेट्टी यांनी शिक्षक आयकर भरणाची रक्कम रु.३,२१,०००/- इतकी नियमबाह्य उचलल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने संबंधित मुख्याद्यापकास सदरची रक्कम तात्काळ भरण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तद्नंतर संबंधित तत्का. मुख्याद्यापक श्री. माणिकराव शेट्टी यांनी दि.१०/०४/२०२३ व दि.११/०४/२०२३ रोजी अनुक्रमे रु.१,५०,०००/- व रु.१,६८,०००/- अशी एकूण-३,१८,०००/- भरणा केलेली आहे. उर्वरीत रु.३०००/- च्या भरणाबाबत संबंधित तत्का. मुख्याद्यापकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सबब, सदर अपहार प्रकरणाच्या अनुषंगाने तत्का. मुख्याद्यापक यांच्याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम-१९६४ मधील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

**राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत**

**(२८) ६४६२९ (२३-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यात एकल महिलांचे प्रमाण जास्त असून सद्य:स्थितीत एकल महिला या सामाजिक व आर्थिक विवंचनेत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अहमदनगर जिल्ह्यातील एकल महिलांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी अहमदनगर जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत व अंगणवाडी मार्फत गावपातळीवर एकल महिलांचे सर्वेक्षण केले असता जिल्ह्यात १ लाख ७२६ एकल महिला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील एकल महिलांच्या समस्या व गरजा जाणून घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित करून त्यांच्यासाठी सर्वसमावेशक योजना बनवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांना शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०६-११-२०२३) :** (१) धुळे जिल्हयात कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे एकल/ विधवा झालेल्या महिलांचे तालुका निहाय सर्वेक्षण करण्यात आलेले असून जिल्हयात एकुण एकल/ विधवा महिलांची संख्या २७५ आहे. तथापि, माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान एकल महिला सामाजिक व आर्थिक विवंचनेत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्या स्तरावरुन केलेल्या सर्व्हेक्षणानुसार अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण १,००,७२६ एकल महिला आढळून आल्या आहेत.
(३) व (४) कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन होवून एकल/विधवा झालेल्या महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मिशन वात्सल्य योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यास शासन निर्णय दि.२७.०८.२०२१ अन्वये मान्यता दिली आहे.

सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन होवून एकल/विधवा झालेल्या महिलांबाबतची माहिती गाव पातळीवर गठित केलेल्या पथकाकडून प्राप्त करुन घेवून अशा महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येरवडा (जि.पुणे) येथील पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्रातून (बालसुधारगृह) मुलांनी पलायन केल्याबाबत

**(२९) ६५९०७ (२३-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरवडा (जि.पुणे) येथील पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्रातून ( बालसुधारगृह) प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ५ मुलांनी पलायन केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालसुधारगृहातून मुले वारंवार पळून जात असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन पलायन केलेल्या मुलांचा शोध घेण्यासह यास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२०-११-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
सदर संस्थेतून ४ मुले न सांगता निघून गेली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) संस्थेतून बालके न सांगता निघून गेल्यानंतर तात्काळ त्यांचा शोध घेण्यासाठी संस्थेतील कर्मचारी यांच्यामार्फत शोध घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. पलायन केलेल्या बालकांचा पोलीसांनी तात्काळ शोध घेतला व सदर बालके पुन्हा संस्थेत पुन्हा दाखल केली आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## केंद्र सरकारच्या किसान केळी उत्पादकांना केळी वाहतूकीसाठी दुप्पट खर्च करावा लागत असल्याबाबत

**(३०) ६६१९० (१२-०९-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने सुरु केलेला शेतीमालाच्या वाहतुकीसाठी रेल्वेची किसान रेल अनुदानाअभावी बंद पडून सुमारे एक वर्षे झाले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या अनुदानाअभावी जळगाव जिल्हयातील केळीसह सर्वच शेतीमालाची जवळपास दुप्पट रक्कम देवून बाजार पेठेत वाहतूक करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून केंद्र शासनाने सदरील अनुदान तातडीने सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही,
केंद्र शासनाने शेतमालाच्या वाहतुकीसाठी सुरु केलेली किसान रेल्वे चालू असून, केवळ कोळसा मार्गावरील रेल्वेसेवा चालविली जात नाही. तसेच केंद्र शासनाकडून किसान रेल्वेला ४५ टक्के दराने अनुदान देण्यात येत असुन, सदर अनुदान दि.३१.०५.२०२३ पर्यंत देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषदेकडून १५ व्या वित्त आयोगातून सौर सिस्टम योजना राबविण्याबाबत**

**(३१) ६६५९१ (२९-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हा परिषदेने सौर सिस्टम ही नवी मोहिम हाती घेतली असून जिल्हयातील प्रत्येक शाळा, ग्रामपंचायतीत १५ व्या वित्त आयोगातून सौर सिस्टम सुविधा बसविण्यास सुरुवात केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मोहिम राज्यातील किती जिल्हयात राबविण्यात आली आहे,
(३) असल्यास, या मोहिमेमुळे किती टक्के विज बीलाचा ताण कमी झाला असल्यास, उर्वरित जिल्हातच सौर सिस्टम सुविधा राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०४-१२-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) अशी कोणतीही मोहिम राबविण्यात आलेली नाही. मात्र काही जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्तरावर १५ केंद्रीय वित्त आयोगाच्या अबंधित निधीमधून शाळा, अंगणवाड्या आणि ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी सौर सिस्टम बसविले आहे.
(३) ज्या जिल्हा परिषदांनी शाळा, अंगणवाड्या आणि ग्रामपंचायत कार्यालय येथे सौर सिस्टम बसविले आहे तेथे २७% ते ९०% विज बिलाचा ताण कमी झाला आहे. सद्यस्थितीत विभाग स्तरावरुन कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील आदिवासी तालुक्यामध्ये कुपोषित बालकांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(३२) ६७६५७ (२३-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात “एक मुठ पोषण” ही योजना राबवून सुध्दा सद्य:स्थितीत जिल्हयातील आदिवासी तालुक्यामध्ये कुपोषित बालकांची संख्या वाढत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार कुपोषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे (३१-०८-२०२३) :** (१) व (२) माहे ऑगस्ट २०२२ मध्ये नाशिक जिल्हयातील आदिवासी क्षेत्रामधील कुपोषित बालकांच्या संख्येच्या तुलनेत माहे एप्रिल २०२३ मध्ये कुपोषित बालकांच्या संख्येत घट झाल्याचे

दिसून आले आहे. माहे ऑगस्ट २०२२ ते एप्रिल २०२३ या कालावधीतील प्रत्येक महिन्याची कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| महिना | कुपोषित बालकांची संख्या |
|---|---|
| ऑगस्ट-२०२२ | १७४ |
| सप्टेंबर-२०२२ | १९७ |
| ऑक्टोबर-२०२२ | १५४ |
| नोव्हेंबर-२०२२ | १३२ |
| डिसेंबर-२०२२ | १२९ |
| जानेवारी-२०२३ | १२३ |
| फेब्रुवारी-२०२३ | १२७ |
| मार्च-२०२३ | १२४ |
| एप्रिल-२०२३ | १३२ |

(३) व (४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

---

**राज्यात नवीन शैक्षणिक धोरणानुसार मराठी माध्यमातून वैद्यकीय शिक्षण व अभियांत्रिकी शिक्षण शिकवण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत.**

**(३३) ६७६९२ (२५-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शैक्षणिक धोरण येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार असून वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षण यापुढील काळात मराठीमध्ये शिकवले जाणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन शैक्षणिक धोरणानुसार मराठी माध्यमातून वैद्यकीय शिक्षण व अभियांत्रिकी शिक्षण शिकवण्यासाठी कृती आराखडा शासनाने तयार केला आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-११-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पहिल्या टप्प्यात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सुधारीत निर्देशांची सन २०२३-२४ पासून अंमलबजावणी करणेबाबत शासनाने दिनांक २०/०४/२०२३ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याकरिता वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई स्तरावर राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे स्तरावर पाठ्यपुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याकरिता वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी व भौतिकोपचार अभ्यासक्रमांच्या तज्ञांचे अभ्यास मंडळ गठीत करण्यात आलेले आहे. प्रत्येक विद्याशाखेच्या अभ्यास मंडळामार्फत नामनिर्देशित महाविद्यालये व तज्ञ व्यक्तींकडून अभ्यासक्रमाचे मराठी भाषांतर झाल्यानंतर सदर अभ्यासक्रम विद्यापीठाच्या मान्यतेनंतर संबंधित विद्याशाखेच्या केंद्रिय परिषद/आयोगाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येईल. याविषयक मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा आराखडा विद्यापीठामार्फत शासन मान्यतेकरिता सादर करण्यात येईल. तसेच, अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता अध्यापनाच्या प्रक्रियेची अंमलबजावणी ऐच्छिक स्वरूपात मराठी माध्यमातून राबविण्यास मान्यता दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भानकवाडी (ता.शिरुर, जि.बीड) येथे नळकांडी पुलाचे बांधकाम होणेबाबत.**

**(३४) ६८५६० (२५-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : तारांकित प्रश्न क्रमांक ५३१४८ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भानकवाडी (ता.शिरुर, जि.बीड) येथे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे भानकवाडी ते साळुंखेवस्ती या रस्त्यावर नळकांडी पुल वाहून जाऊन त्यात तीन (३) बालकांचा मृत्यू झाल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नदीवर पूल बांधण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी बीड व मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांचेकडे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी पत्राद्वारे तसेच दिनांक २२ मे, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त नदीवर नळकांडी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर ठिकाणी नळकांडी पूल अस्तित्वात नसल्याने पूर परिस्थितीवेळी ओढा ओलांडण्याचा प्रयत्न करतांना तीन बालकांचा मृत्यू झाला आहे.
(२) दि.२८.१०.२०२२ रोजीचे पत्र जिल्हा परिषदेस प्राप्त झाले आहे.
(३) भानकवाडी ते साळुंखेवस्ती रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.३६ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या सा.क्र.०/२५० मध्ये मोठा ओढा आहे. सदर ठिकाणी नवीन नळकांडी पूलाचे बांधकाम करणे आवश्यक असून सदर नळकांडी पूलाचे काम जिल्हा परिषदेमार्फत सन २०२३-२४ आपत्ती सौम्यीकरण योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमगाव (जि. चंद्रपूर) येथील अनाथालयालयास मिळणारे शासकीय अनुदान थकीत असल्याबाबत**

**(३५) ६८८५४ (२५-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव (जि. चंद्रपूर) येथील अनाथालयास मिळणारे शासकीय अनुदान मागील पाच वर्षापासून थकीत असल्यामुळे आश्रमातील अनाथ बालकांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनाथालयास त्वरीत शासकीय अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे (२४-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय, दि.२३.०४.२०२० अन्वये सदर संस्थेचे सन २०१९-२० चे आणि शासन निर्णय, दि.२४.११.२०२१ अन्वये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे मुल्यानिर्धारणाधारे अंतिमीकरणानुसार ८०% अनुदान अदा करण्यात आलेले असून सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे ८०% अनुदान शासन निर्णय, दि.१४.०२.२०२३ अन्वये वितरीत करण्यात आले आहे. तथापि, कोषागाराकडून धनादेश विलंबाने प्राप्त झाल्याने सदर अनुदान माहे जून, २०२३ मध्ये अदा करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवरे (भेंदवाडी) (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) धरणग्रस्त १४ कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३६) ६८९३८ (३०-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवरे (भेंदवाडी) धरण (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) दिनांक २ जुलै, २०१९ रोजी फुटून संपूर्ण गाव उध्वस्त होऊन त्यात २३ जणांना जीव गमवावा लागला होता, या दुर्घटनेला ४ वर्ष झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिवरे धरण बाधित ५६ कुटूंबापैकी काही कुटूंबांचे मौजे अलोरे (ता. चिपळूण, जि.सिंधुदुर्ग) येथे पुनर्वसन झाले असून यातील १४ कुटुबियांनी त्यांचे पुनर्वसन तिवरे गावातच होणेसंदर्भात शासनाकडे विनंती केल्याचे अनुषंगाने प्रशासनाने देखील पुनर्वसनाकरीता जागा योग्य असल्याची संमती दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिवरे धरणबाधित १४ कुटूंबियांच्या नावे पुनर्वसित जागेचा सातबारा १८७३/१ तयार झाला असून खरेदीखत देखील झाले आहे, तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, रत्नागिरी या विभागाने सदर जागेचे निरीक्षण करुन मौजे तिवरे गट नं. १८७३/१ ही जागा पुनर्वसन करणेच्या दृष्टीने योग्य असल्याचे तहसिलदार, चिपळूण यांना अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, चिपळूण सार्वजनिक बांधकाम विभागाने खुल्या निविदेची जाहिरात प्रसिध्द केली असून १४ घरांच्या बांधकामाकरीता ई-निविदेचे वेळापत्रक देखील प्रसिध्द केले आहे, मात्र अद्यापही सदर पुनर्वसित जागेचा सर्व्हे तसेच प्लॉटिंग झालेले नाही, हे ही खरे आहे काय.

(५) असल्यास, तिवरे धरणबाधित १४ कुटूंबिय अद्यापही बेघर असून सद्या आपल्या जवळच्या कुटूंबियांकडे वास्तव्य करत आहेत, त्यांची तिवरे गावातच शेती आणि जमीन असल्याने त्यांचेसमोर निवारा, उपजिविकेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यातच सद्या पावसाच्या हंगामाला सुरुवात झाली असल्याने पुनर्वसनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा म्हणून प्रशासनाकडे वारंवार विनंती करुनही अद्याप १४ कुटूंबियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागलेला नाही, हे ही खरे आहे काय.

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तिवरे धरण बाधित १४ कुटूंबियाच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. संजय राठोड (११-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे

मा. स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, आष्टी जि. बीड यांचेकडे तोंडी मागणी करण्यात आलेली आहे.

(४) सदर कामांच्या सर्वेक्षणाचे काम मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचे मार्फत हाती घेण्यात आले असून सर्वेक्षणाअंती योजनेची व्यवहार्यता तपासून अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथिल सर जे.जे. रुग्णालय व महाविद्यालयातील परिचर्या शिक्षण संस्थेतील प्राध्यापक यांच्यावर झालेला अन्याय

**(३७) ७०५६९ (२५-०८-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथिल सर जे.जे. रुग्णालय व महाविद्यालयातील परिचर्या शिक्षण संस्थेतील प्राध्यापक पदावर काम करीत असलेल्या डॉ.मीना सोनावणे यांनी वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार मागासवर्गीय प्राध्यापक रिक्त पदासाठी अर्ज करुन त्यांच्या मेरीटनुसार निवड झाली असतानाही तत्कालीन अधिष्ठाता यांनी परिचित महिलेद्वारे सदरहू या मागासवर्गीय महिलेविरुद्ध पदासाठी पात्र नसतानाही एम.पी.एस.सी.ला अर्ज करुन बेकायदा नियुक्ती मिळविल्याचा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे खोटी तक्रार केल्याने डॉ.मीना सोनावणे यांची पदावनती केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राध्यापिका यांचा दोन वर्षाचा प्रोबेशन कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्राध्यापक पदावर नियुक्ती होणे आवश्यक असताना अधिष्ठाता यांनी पदाचा दुरुपयोग करुन त्यांची २७० दिवसांची खोटी रजा दाखवून त्यांचा प्रोबेशन कालावधी वाढवून त्यावर संचालकाची स्वाक्षरी घेऊन प्रा.सोनावणे यांच्यावर अन्याय केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-१०-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार श्रीमती मीना सोनावणे यांना दि.२९.०८.२०१९ च्या आदेशान्वये प्राध्यापक या पदावर पूर्ववत फेरनियुक्ती देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) होय, अंशत: खरे आहे.

श्रीमती मीना सोनावणे यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.७०५/२०१६ दाखल केला होता. त्यांनी परिविक्षाधिन कालावधीमध्ये २२ दिवसांची अर्जित रजा घेतल्याने मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार दि.०३.०४.२०१९ च्या शासन आदेशान्वये त्यांचा परिवीक्षाधिन कालावधी २२ दिवसाने वाढवून दि.११.०२.२०१५ पासून समाप्त करण्यात आला आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उप अभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग, बीड यांच्याकडून होत असलेल्या अनियमितता व दर्जाहिन कामाबाबत

**(३८) ७१४०५ (२८-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपअभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग, बीड येथील उपअभियंता श्री.पवार यांच्या सन २०२२ ते आजपर्यंतच्या पदाच्या कार्यभारबाबत त्यांच्याकडून होत असलेल्या दर्जाहीन कामाच्या बाबतीत अनेक स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ३०५४ व ५०५४ ची रस्ता सुधारणा, पुल बांधकाम व इतर कामे, अनुसूचित जाती नवबौद्ध घटकाच्या वस्तीचा विकास करणे, अंगणवाडी बांधकाम, शाळा दुरूस्ती करणे, तांडावस्ती सुधार योजना, ठक्कर बप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, ग्रामपंचायत अंतर्गत वित्त आयोगाची कामे, शाळा खोली बांधकाम व दुरूस्ती करणे, मनरेगाची कामे, नविन प्राथिमक आरोग्य केंद्र व दुरूस्ती कामे, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नवीन व दुरूस्ती कामे, नविन पशुवैद्यकीय केंद्र व दुरूस्ती कामे, नविन पशुवैद्यकीय उपकेंद्र व दुरूस्ती कामे व इतर लेखाशिर्षातील विविध कामे याबाबतीत दर्जाहीन कामे झाल्याने शासनाच्या पैशाचा मोठ्या प्रमाणात अपव्यय झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित उपअभियंता यांच्या कालावधीमध्ये झालेल्या सर्व तांत्रिक, प्रशासकीय व कार्यारंभ आदेश पूर्ण व अपूर्ण कामांची कामनिहाय, स्तरनिहाय तसेच दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या वतीने तपासणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनास दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या वतीने कोणता अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०८-१२-२०२३) :** (१) नाही, फक्त मा. आ.श्री. संदिप रवींद्र क्षीरसागर, बीड विधानसभा मतदार संघ यांची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) जिल्हा परिषदेची कामे दक्षता व गुण नियंत्रण मंडळ तपासत नाही, तर जिल्हा परिषद स्तरावरुन राज्य गुणवत्ता निरीक्षकाची नेमणूक करण्यात येते व त्यांनी दिलेल्या तपासणी अहवालानुसार देयके अदा केली जातात.

(५) होय, चौकशी करण्यात आलेली असून कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नाही.

---

## तासगांव-कवठेमहांकाळ (जि.सांगली) या तालुक्यातील गावांना टेंभू पाणी योजनेच्या माध्यमातुन पाणी मिळणेबाबत

**(३९) ७१७४५ (११-१२-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), अॅड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव-कवठेमहांकाळ (जि.सांगली) या तालुक्यातील गावांना टेंभू पाणी योजनेच्या माध्यमातुन पाणी मिळावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०३ आक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच योजनेच्या माध्यमातून कायमस्वरुपी दुष्काळी असलेल्या पाडळी, धामणी (ता.तासगाव) या गावांतील पाझर तलाव भरुन द्यावेत अशीही मागणी येथील नागरीकांनी वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने टेंभू पाणी योजनेच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त गावांना पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्पाचा प्रस्तावित तृतीय सुधारीत प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारशीसह महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावात टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्पामधील टप्पा क्र.५ वरून सांगली जिल्ह्यातील तासगांव तालुक्यातील सावळज, सिद्धेवाडी, दहिवडी, जरंडी, वायफळे, यमगरवाडी, बिरणवाडी, डोंगरसोनी या ८ गावांना व कवठेमहांकाळ तालुक्यातील केरेवाडी, शेळकेवाडी, जाखापूर, रायवाडी, तिसंगी, घाटनांद्रे, गर्जेवाडी, वाघोली, कुंडलापूर या ९ गावांतील क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे तसेच, टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्पामधील टप्पा क्र.६ वरून तासगांव तालुक्यातील घाडगेवाडी वितरीकेवरून पाडळी व धामणी या गावांतील क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे.

लोकप्रतिनिधीनी व ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, पंचायत समिती, तासगांव आणि लाभधारक शेतकरी यांनी केलेल्या मागणीनुसार टेंभू उपसा सिंचन योजनेद्वारे तासगांव तालुक्यातील व कवठेमहंकाळ तालुक्याकरीता ४९ गावातील एकूण १३७ तलाव बंधाऱ्यामध्ये ८०५.८९ दलघफू पाणी देण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायत धामणी यांनी दि.२७/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये धामणी पाझर तलावामध्ये पाणी सोडणेबाबतच्या मागणीनुसार आगामी नियोजित रब्बी हंगाम सन २०२३-२४ मध्ये प्रथम प्राधान्याने सदर तलावांमध्ये पाणी देण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या शासकीय जमिनींवर अतिक्रमणे होत असल्याबाबत**

**(४०) ७१७७८ (११-१२-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये खडकवासला, वरसगाव, पानशेत, टेमघर धरणाच्या शहरी भागातून जाणाऱ्या जुना डावा व उजवा मुठा कालवा आणि नवीन मुठा कालवा करीता संपादित केलेल्या जागेचा देखील समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासकीय जागांवर वारंवार मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत असतानाही त्यावर वेळेत प्रतिबंध घालून कारवाई न केल्यामुळे शासकीय मालमत्तेचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात सखोल चौकशी करुन जलसंपदा विभाग व महानगरपालिका यांच्यात योग्य तो समन्वय ठेवून हे अतिक्रमण हटविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या शासकीय जमिनीवर वारंवार अतिक्रमणे होत आहेत. यापूर्वी सन २०१९ व सन २०२१ मध्ये महानगरपालिका, जलसंपदा विभाग व पोलिस यंत्रणेच्या संयुक्त मोहिमेद्वारे अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत.
(४) जलसंपदा विभागाकडे अतिक्रमणे प्रतिबंधक तथा निष्काषित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. विभागाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण निदर्शनास येताच महसूल व पोलिस यंत्रणेच्या समन्वयाने अतिक्रमण निष्कासनाबाबत कार्यवाही केली जाते. विभागीय आयुक्त स्तरावर जलसंपदा विभाग, पुणे महानगरपालिका, महसूल यंत्रणा व पोलिस

यंत्रणा यांची संयुक्त समिती गठीत केल्यास अतिक्रमणे हटविण्याची मोहिम शीघ्रगतीने करता येईल. या अनुषंगाने सदर समिती कायमस्वरूपी तत्वावर गठीत करणे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील रुग्णांचा समावेश करण्याबाबत

**(४१) ७१९८९ (०८-०२-२०२४). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या नागरिकांना तब्बल १३५६ आजारांवर प्रति कुटुंब दीड लाख रुपयावरून पाच लाख रुपये पर्यंत आरोग्य संरक्षण देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा फुले जन आरोग्य योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकुर्डी, जिजामाता आणि भोसरी या रुग्णालया मधील रुग्णांना लाभ होण्याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने परिपूर्ण प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील आकुर्डी जिजामाता आणि भोसरी या रुग्णालयातील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना मध्ये समाविष्ट नसल्याने शहरातील तिन्ही रुग्णालयांमधील रुग्णांना औषधोपचार व लाभापासून वंचित रहावे लागत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये उद्योग नगरीतील तिन्ही रुग्णालयांचा समावेश करण्याबाबतच्या परिपूर्ण प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०६-२०२४) :** (१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत एकूण १३५६ आजारांचा समावेश करण्यात आला असून प्रति कुटुंब ५ लाख रुपये आरोग्य संरक्षण देण्यात आले आहे. तथापि योजना कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही सुरु असून प्रशासकीय कार्यवाही पूर्ण होताच योजना अमलात येईल.
(२) हे खरे आहे.
तिन्ही रुग्णालयांचे ऑनलाईन पोर्टलवर प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ मधील तरतुदी नुसार समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समितीमध्ये निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही राज्य आरोग्य हमी सोसायटीद्वारे करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयातील गिरणा धरणांच्या पाटचाऱ्याची दुरुस्ती प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ७३०६६ (११-१२-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील गिरणा धरणाची साठवण क्षमता १८ टीएमसी असून त्याद्वारे चाळीसगाव, भडगांव, पाचोरा, एरंडोल व धरणगांव या तालुक्यातील २१ हजार हेक्टर शेतीला लाभ मिळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाळीसगांव, भडगांव येथील काही भागात पाटचाऱ्यांची दुरावस्था, लोखंडी पाटया व व्हॉल्व्ह खराब होणे, गळती होणे, नादुरुस्ती इत्यादी कारणांमुळे शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचत नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे वारंवार निवेदन देऊनही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

गिरणा धरणाचा उपयुक्त पाणीसाठा १८.४८ टीएमसी असून या प्रकल्पाचे एकूण लाभक्षेत्र ५७२०९ हे. आहे. त्यापैकी चाळीसगांव, भडगांव, पारोळा, एरंडोल व धरणगांव तालुक्यातील एकूण लाभक्षेत्र ४६९५१ हे. आहे.
(२) अंशत: खरे आहे.

कालव्यांचे गेट तसेच इतर अनुषंगिक भागांची दुरूस्ती आवश्यक असली तरी सद्य:स्थितीत सिंचन आवर्तन कालावधीत कालव्यांच्या शेवटपर्यंत लाभधारकांना सिंचनाचा लाभ देण्यात येत आहे.
(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्पास रब्बी हंगामापूर्वी करण्यात येणाऱ्या नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. मात्र प्रकल्पास पुर्ण होऊन साधारणत: ५० वर्षे झालेली असल्याने कालवा प्रणालीच्या विविध भागांकरिता दुरूस्ती आवश्यक आहे. याकरिता प्रकल्पाचा समावेश प्रस्तावित महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत करण्यात आला असून त्यादृष्टीने प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्षाकडून राबविण्यात येणा-या इंजिनिअरिंग प्रवेश फेऱ्यानंतर नियमबाहयरित्या प्रवेशप्रक्रीया होत असल्याबाबत**

**(४३) ७३१७० (२०-०२-२०२४). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्षाकडून इंजिनिअरिंग प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रवेश फेऱ्यानंतर महाविद्यालयांमध्ये रिक्त राहणाऱ्या व मॅनेजमेंट कोट्यातील जागांची माहिती जाहिर करण्यात येत नसल्यामुळे प्रवेशाच्या नियमांचे उल्लंघन करुन मोठया प्रमाणात रिक्त जागांची विक्री होत असल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी दिनांक २० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०३-०५-२०२४) :** (१) अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या काही संस्थांमधील, संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेबाबत, सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे विद्यार्थी संघटनांनी दि.२१ व २२ ऑगस्ट, २०२३ रोजी निवेदन सादर केले होते.
(२) वरील निवेदनातील तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी तंत्र शिक्षण संचालनालयास चौकशी करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार सदर प्रकरणी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे स्तरावर त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली होती.तक्रारी दाखल झालेल्या सर्व संस्थांनी

संस्थास्तरावरील व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक (ACAP) जागांवरील प्रवेश, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रसिध्द केलेल्या माहिती पुस्तिकेतील नियम क्रमांक १३ नुसार प्रवेश प्रक्रिया राबविल्याचे चौकशी समितीने अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांची बाजार भावापेक्षा अधिक दर देण्याचे अमिष दाखवून केलेली फसवणूक

**(४४) ७४४१२ (१०-१२-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील जगन उर्फ जग्गू रामचंद्र नारखेडे यांनी अनेक शेतकऱ्यांना कापसाची थेट खरेदी करून बाजारभावापेक्षा अधिक दर ४० दिवसात देण्याचे आमिष दाखवून देखील मोबदला न देता फरार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त व्यक्तीने विविध ठिकाणी शेतकऱ्यांची फसवणूक केली असतानाही पोलीस यंत्रणेने त्याचेवर कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत तसेच फरार आरोपीस पकडणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.
मलकापूर (जि.बुलडाणा) या तालुक्यातील भालेगाव गावातील श्री.जगन ऊर्फ जग्गु रामचंद्र नारखेडे याने अनेक शेतकऱ्यांकडून कपाशी थेट खरेदी करुन बाजारभावापेक्षा अधिक दर देण्याचे आमीष दाखवुन विक्री झालेल्या कापसाचा मोबदला ४० दिवसांत देण्याचे कबुल करुन मोबदला न देता दि. २६.१०.२०२३ पासुन फरार झाला आहे.
(२) व (३) उक्त प्रकरणी शेतक-यांची फसवणुक झाल्याने फिर्यादी यांच्या तोंडी रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन मलकापुर शहर येथे गुन्हा नं. ६००/२०२३ कलम ४२०, ४०६,३४ भादंवि अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयांत श्री. राजेंद्र पांडुरंग पाटील, रा. कुंड बु. ता. मलकापुर व श्री. शरद विष्णु बोरले, रा मोरखेड ता. मलकापुर या दोन आरोपींना दि.०१/१२/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी जगन ऊर्फ जग्गु रामचंद्र नारखडे याचा शोध घेणेकामी गोपनीय पथक नेमण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) व नाशिक येथील शेतकऱ्यांची अनुदानित सौरपंप बसवण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(४५) ७४७३७ (१०-१२-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) आणि नाशिक येथील ८३ शेतकऱ्यांची दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी अनुदानित सौरपंप बसवण्यासंदर्भात फसवणूक करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात वैजापूर पोलिसात दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही तसेच संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) होय. राज्यातील वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) आणि नाशिक येथील ८३ शेतकऱ्यांची अनुदानित सौरपंप बसवण्यासंदर्भात फसवणूक करण्यात आल्याबाबत वैजापूर पोलीस ठाणे (औरंगाबाद ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणी वैजापूर पोलीस ठाणे (औरंगाबाद ग्रामीण) येथे ४ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्ह्यातील ४ आरोपींपैकी ३ आरोपी मध्यवर्ती कारागृह हर्सूल, छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस कोठडीत आहेत. १ आरोपी फरार असून त्याचा शोध घेण्यात येत आहे. सदर प्रकरणातील फसवणूक झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याचा जबाब नोंदविण्याची प्रक्रीया पोलीसांकडून सुरू असून अधिक तपास पोलीसांकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवघर (ता.कणकवली, जि.सिधुदुर्ग) धरणाच्या कालव्यातील चिखलात रुतून १६ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४६) ७५१९९ (११-१२-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील देवघर धरणाच्या कालव्यातील चिखलात रुतून रमेश शिरवलकर या १६ वर्षीय मुलाचा दुर्देवी मृत्यु झाल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानवी वस्तीलगत असलेल्या या कालव्याला आच्छादन करण्याकडे जलसंपदा विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे अशा घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे, कालव्याची दुरुस्ती करणे, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळणेसंदर्भात तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

श्री. उदय राजेश उर्फ रमेश शिरवलकर हा दि.३१/०८/२०२३ रोजी गुरे चरविण्यासाठी गेला असताना साईनगर येथील कालव्यावर बांधलेल्या पुलावर बसला होता. त्यावेळी त्याचा अचानक पाठीमागे तोल जाऊन तो कालव्याच्या पाण्यात पडुन बुडुन त्याचा अकस्मात मृत्यू झाला आहे.
(२) हे खरे नाही.

विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या कालव्यांना आच्छादन करण्यात येत नाही. तसेच अशाप्रकारे आच्छादन करण्याबाबत विभागाचे कोणतेही धोरण नाही व अशी कोणतीही मागणी प्राप्त झालेली नव्हती.
(३) मयताच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून अर्थसहाय्य मिळणेकामी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दि.१३/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भांडूप येथील महिलेची म्हाडाकडून फसवणूक झाल्याबाबत**

**(४७) ७५२१५ (१०-१२-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडूप, मुंबई येथे राहणा-या अनिता सोमनाथ गोवेकर या महिलेच्या पतीच्या मालकीची सदनिका म्हाडा अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कोणतेही खरेदी-विक्री व्यवहार न करता एका दुसऱ्या व्यक्तीच्या नावे केल्याचा

धक्कादायक प्रकार माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महिलेची फसवणूक केल्याची लेखी कबुली म्हाडाने दिली असून पोलीसांना तपास करण्यासाठी पत्र दिले असतानाही तसेच सदर महिला तक्रार देण्यासाठी फेऱ्या मारत असतानाही ७ महिन्यांपासून चारकोप पोलीस ठाण्यात तक्रार घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर महिलेची सदनिका परत मिळवून देण्यासह या गुन्हयातील आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२३) :** (१) व (२) सदर प्रकरणी चारकोप पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली होती, हे खरे आहे. सदर तक्रार अर्जाची पोलीसांकडून चौकशी करण्यात आली असून अर्जदार यांची तक्रार ही प्रथमदर्शनी दिवाणी स्वरुपाची असून त्याबाबत अर्जदार यांनी संबंधित न्यायालय/संबंधित प्राधिकरण यांच्याकडे दाद मागावी अशी अर्जदारास लेखी पत्राद्वारे समज देण्यात आली आहे.
(३) पोलीसांनी अर्जदार व गैरअर्जदार यांच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये असे दिसून आले आहे की, त्यांच्यामध्ये मालकी हक्कावरुन वाद असून सदर बाबत मा. सिटी सिव्हील कोर्ट, दिंडोशी, मुंबई येथे एप्लिकेशन क्र. (प्रॉपर्टी सुट) ५२८/२०२२ अन्वये दावा दाखल आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बंदरांचा विकास करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(४८) ७५९४३ (२९-०२-२०२४). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याला ७२० किमी लांबीची किनारपट्टी लाभली असून या किनारपट्टीवर ५० लहान मोठी बंदरे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती बंदरातून प्रत्यक्षात माल हाताळणी व जलवाहतुकीला प्राधान्य दिले जाते तसेच राज्यातील माल हाताळणी व जलवाहतुकीची सद्य:स्थिती काय आहे.,
(३) असल्यास, बंदरांचा विकास साधण्यासाठी खासगी क्षेत्राचा सहभाग घेतला जात आहे काय,
(४) असल्यास, शासनाने यासाठी बंदर विकास धोरण वा बंदर विकास प्रकल्प आखला आहे काय,
(५) असल्यास, या नव्याने येणाऱ्या प्रकल्पांना किती रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीवर एकूण ४८ लहान बंदरे अधिसूचित आहेत.
(२ सद्यस्थितीत, १५ बंदर सुविधांद्वारे मालहाताळणी आणि एकूण ३४ जलमार्गांवर प्रवासी जलवाहतूक होत आहे. सन २०२३-२४ मध्ये, महाराष्ट्रातील लहान बंदरांमधून ७६.८७ दशलक्ष टन इतकी मालहाताळणी झाली आहे आणि १.८४ कोटी प्रवाशांची जलवाहतुकीद्वारे वाहतूक झाली आहे.
(३) होय.
(४) गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १८.०८.२०२३ अन्वये महाराष्ट्र सागरी विकास धोरण-२०२३ निर्गमित करण्यात आले आहे.
(५) महाराष्ट्र सागरी विकास धोरण-२०२३ अन्वये बंदरांचे लघु, लहान, मध्यम, मोठे आणि विशाल असे वर्गीकरण करण्यात आले असून, त्यामध्ये रु.१० कोटींपासून रु.३००० कोटी इतकी गुंतवणूक अपेक्षित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मीरारोड (जि.ठाणे) येथे म्हाडाची घरे देण्याचे अमिष दाखवून झालेली फसवणूक

**(४९) ७६३१० (१०-१२-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरारोड (जि.ठाणे) येथे म्हाडाच्या इमारतीत स्वस्त दरात घर देण्याचे आमिष दाखवून इमारतीची बनावट कागदपत्रे व रबरी शिक्के इत्यादीचा वापर करुन अनेक नागरिकांची फसवणूक केल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल केला असून त्याअनुषंगाने मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची गुन्हे शाखा १ सदर प्रकरणी तपास करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन फसवणूक झालेल्या व्यक्तींना दिलासा देणेसंदर्भात तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ३६५/२०२३ कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, १२०-ब, १७० भा.द.वि. अन्वये दि.२१.०९.२०२३ रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास भाईंदर पोलीस ठाणे यांच्यामार्फत करण्यात आहे.

(३) सदर गुन्ह्यातील ५ आरोपींना दि.२१.०९.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. सध्या आरोपींना जामीन मिळाला आहे. तसेच आरोपींनी फसवणूक करुन घेतलेले पैसे परत करण्याच्या अटीवर मा. न्यायालयाने आरोपींना जामीन मंजूर केला आहे. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार आरोपींनी सदर रक्कम फिर्यादीस परत न केल्यास सदर जामिन आपोआप रद्द होणार आहे. त्यानुसार, सध्या प्राप्त रु. २ लाख ५० हजार इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्ह्याचा अधिक तपास पोलीसांकडून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात रुग्ण तपासणीची वेळ वाढविणेबाबत

**(५०) ७६५४० (२१-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात दररोज २००० पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत केली जाते , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता उक्त वेळेत आलेल्या सर्व रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार करणे शक्य होत नसल्यामुळे बाह्यरुग्ण विभागात रुग्ण तपासणीचा वेळ सकाळी ९.०० ते दुपारी १.०० व सायंकाळी ४.०० ते ६.०० करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) अंबाजोगाई (जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात सर्व रुग्णांची तपासणी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत केली जाते. तसेच संस्था प्रमुखांमार्फत सर्व विभाग प्रमुखांना बाह्यरुग्ण विभागात थांबून त्यांची तपासणी व उपचार करण्यांस सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.